Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843

दैनिक जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स
मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

। शनिवार, दि. १८ जूलै २०२६ । वर्ष १ । अंक १०० । पाने २ । Title Code - T/MH/2026/0422/5204/1306 DIGITAL EDITION



धुळ्यात १२ किलो गांजासह दोघांना अटक

(पान २ वर)

» Selected

## अहिल्यानगरात ९ ऑगस्टला विराट संविधान बचाव मोर्चा

**अहिल्यानगर :** अहिल्यानगर शहरातील सिद्धार्थ बुद्ध विहार, सिद्धी बाग येथे समस्त आंबेडकरी समाजाच्या अनुयायांची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत अनुसूचित जातींच्या आरक्षणातील उपवर्गीकरणाच्या निर्णयाला तीव्र विरोध व्यक्त करण्यात आला. तसेच संविधानाच्या मूलभूत तत्त्वांचे संरक्षण करण्यासाठी व्यापक लोकआंदोलन उभारण्याचा निर्धार करण्यात आला. बैठकीतील चर्चेनंतर ९ ऑगस्ट क्रांती दिनानिमित्त अहिल्यानगर शहरात विराट संविधान बचाव मोर्चा काढण्याचा निर्णय सर्वानुमते घेण्यात आला. या मोर्चात जिल्हाभरातील आंबेडकरी समाज, विविध सामाजिक संघटना, शासकीय सेवानिवृत्त अधिकारी-कर्मचारी तसेच संविधानप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने सहभागी होणार असल्याची माहिती देण्यात आली.

## संसदेवरील मोर्चासाठी सोनम वांगचुक यांचा निर्धार, सरकारने संवाद साधावा अशी मागणी

# सोमवारपर्यंत प्राण सोडणार नाही : सोनम वांगचुक

## उपोषणाचा २०वा दिवस; प्रकृती चिंताजनक असूनही आंदोलनावर ठाम

**जन सम्राट टाईम्स**

**नवी दिल्ली । दिल्लीतील जंतरमंतर येथे सुरू असलेल्या बेमुदत उपोषणाच्या २०व्या दिवशी शिक्षणतज्ज्ञ आणि पर्यावरणवादी कार्यकर्ते सोनम वांगचुक यांनी संसदेवर प्रस्तावित मोर्चाबाबत ठाम भूमिका घेतली.**



"काहीही झाले तरी २० जुलैला संसदेवर निघणाऱ्या मोर्चात सहभागी होईपर्यंत मी प्राण सोडणार नाही," असा निर्धार त्यांनी व्यक्त केला. प्रकृती चिंताजनक असल्याचे डॉक्टरांनी सांगितले असतानाही वांगचुक आपल्या भूमिकेवर ठाम असल्याने आंदोलनाला नवे वळण मिळाले आहे. केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी सुरू असलेल्या आंदोलनाचा शुक्रवारी २८वा दिवस होता. या आंदोलनाचा परमोच्च बिंदू म्हणून २० जुलै रोजी संसदेवर शांततापूर्ण मोर्चा काढण्याचा निर्णय आंदोलकांनी घेतला आहे. याच पार्श्वभूमीवर समर्थकांशी संवाद साधताना वांगचुक यांनी आपला निर्धार व्यक्त केला."मी २० जुलैपर्यंत जिवंत राहणारच. जर तुम्ही मोठ्या संख्येने आंदोलनात सहभागी झाला नाहीत आणि हा मोर्चा यशस्वी झाला नाही, तर मी भूत बनून परत येईन," असे त्यांनी मिश्कील शैलीत म्हटले. त्यांच्या या वक्तव्यामुळे आंदोलनस्थळी काही काळ हलके-फुलके वातावरण निर्माण झाले. मात्र, दुसरीकडे डॉक्टरांनी त्यांच्या प्रकृतीबाबत चिंता व्यक्त केली आहे. गेल्या २० दिवसांच्या उपोषणामुळे वांगचुक यांचे सुमारे ९.५ किलो वजन घटले असून त्यांच्यात सौम्य निर्जलीकरणाची लक्षणे आढळत आहेत. तरीही त्यांची मानसिक स्थिती स्थिर असून ते पूर्णपणे शुद्धीवर असल्याचे वैद्यकीय पथकाने स्पष्ट केले. दरम्यान, आंदोलनाला राजकीय पाठिंबाही वाढत आहे. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पवन खेडा यांनी जंतरमंतर येथे भेट देऊन वांगचुक यांच्या आंदोलनाला पाठिंबा जाहीर केला. "लोकशाहीमध्ये नागरिक उपोषणाच्या माध्यमातून आपली भूमिका मांडत असतील, तर सरकारने त्यांच्याशी संवाद साधणे हेच राजधर्म आहे," असे खेडा यांनी सांगितले.

### सरकारच्या भूमिकेकडे लक्ष...

माजी मुख्यमंत्री आणि पीपल्स डेमोक्रॅटिक पक्षाच्या अध्यक्षा मेहबूबा मुफ्ती यांनी केंद्र सरकारवर टीका केली. आंदोलनकर्त्यांशी संवाद साधण्यास नकार देणे ही लोकशाहीला न शोभणारी आणि वसाहतवादी मानसिकतेची भूमिका असल्याचा आरोप त्यांनी सामाजिक माध्यमावरील पोस्टद्वारे केला. दरम्यान, अभिनेता आमिर खान यांनी 'थ्री इडियट्स' चित्रपटातील आपली भूमिका सोनम वांगचुक यांच्या जीवनावर आधारित नसल्याचे स्पष्ट केल्यानंतर नव्या राजकीय चर्चांना तोंड फुटले आहे. काँग्रेस, आम आदमी पक्ष आणि राष्ट्रीय जनता दलाच्या नेत्यांनी या स्पष्टीकरणावर प्रश्नचिन्ह उपस्थित करत सत्ताधाऱ्यांच्या दबावामुळे अशी भूमिका घेतल्याचा आरोप केला.२० जुलैच्या संसदेवरील मोर्चामुळे जंतरमंतरवरील हे आंदोलन आता राष्ट्रीय राजकारणाच्या केंद्रस्थानी पोहोचले असून, केंद्र सरकार पुढे कोणती भूमिका घेते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

जन सम्राट टाईम्स — ब्रेक न्यूज

## वांगचुक यांच्या आंदोलनाला जळगावकरांचा पाठिंबा!

### जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने



**जन सम्राट टाईम्स**

**जळगाव| प्रतिनिधी:** लडाखमधील शिक्षण, पर्यावरण संवर्धन आणि विद्यार्थ्यांच्या भविष्याशी संबंधित विविध मागण्यांसाठी दिल्लीतील जंतर-मंतर येथे सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांनी सुरू केलेल्या उपोषणाला १९ दिवस पूर्ण झाल्याच्या पार्श्वभूमीवर जळगावातील जागरूक नागरिकांनी त्यांच्या आंदोलनाला नैतिक पाठिंबा जाहीर केला आहे. या अनुषंगाने सोमवारी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर शांततापूर्ण निदर्शने करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यासंदर्भात जळगावातील गजानन मालपुरे यांच्या कार्यालयात समविचारी नागरिकांची बैठक पार पडली. बैठकीस गजानन मालपुरे, शरद तायडे, ॲड. जमील देशपांडे, विनोद शिंदे, अशोक लाडवंजारी, जमील शेख यांच्यासह विविध क्षेत्रातील सामाजिक कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते. बैठकीत विद्यार्थ्यांचे भविष्य, शिक्षण व्यवस्था, पर्यावरण संरक्षण आणि लोकशाही मार्गाने मांडलेल्या मागण्यांच्या समर्थनार्थ जळगावातून एकजुटीने आवाज उठविण्याचा निर्णय सर्वानुमते घेण्यात आला. त्यानुसार सोमवारी दुपारी १२ ते १ या वेळेत जिल्हाधिकारी कार्यालय, जळगाव येथे शांततापूर्ण निदर्शने आयोजित करण्यात येणार आहेत. उपस्थितांनी मत व्यक्त केले की, विद्यार्थ्यांच्या भविष्याशी संबंधित प्रश्न हा केवळ एका राज्यापुरता मर्यादित नसून तो संपूर्ण देशातील तरुणाईच्या भविष्याशी निगडित आहे. शिक्षण, लोकशाही मूल्यांच्या रक्षणासाठी सुरू असलेल्या आंदोलनाला नैतिक पाठिंबा देणे ही प्रत्येक जागरूक नागरिकाची जबाबदारी आहे. बैठकीत जळगाव शहर व जिल्ह्यातील सर्व सामाजिक संस्था, युवक संघटना, महाविद्यालयीन विद्यार्थी-विद्यार्थिनी, शिक्षक, पालक तसेच जागरूक नागरिकांनी मोठ्या संख्येने निदर्शनात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले.

## हरित यज्ञ अभियानाला धरणगाव तालुक्यात उत्स्फूर्त प्रतिसाद; २०० वृक्ष लागवडीचा संकल्प

**जन सम्राट टाईम्स**

**धरणगाव | प्रतिनिधी :** पर्यावरण संवर्धन, वाढते तापमान, घटते प्राणवायूचे प्रमाण आणि निसर्गाचा समतोल राखण्याच्या उद्देशाने जगद्गुरु रामानंदाचार्य स्वामी नरेंद्राचार्यजी महाराज (नाणीजधाम) यांच्या प्रेरणेने देशभर राबविण्यात येणाऱ्या 'हरित यज्ञ' वृक्षारोपण अभियानाला धरणगाव तालुक्यात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. "वृक्ष ही जीवन, वृक्ष हाच धर्म" हा संदेश समाजापर्यंत पोहोचवत धरणगाव, पाळधी, धानोरे, बांभोरी, गंगापुरी आदी परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. या अभियानांतर्गत शिवसेना (उबाठा) उपनेते गुलाबराव वाघ, नगरसेवक परमेश्वर महाजन, सामाजिक कार्यकर्ते ज्ञानेश्वर महाजन, तालुकाप्रमुख प्रमोद बयस तसेच गुरुबंधू यांच्या हस्ते शहरातील बालाजी नगर व विविध ठिकाणी वृक्षांची लागवड करण्यात आली.

पर्यावरण संरक्षणाची सामूहिक जबाबदारी स्वीकारत नागरिकांनीही या उपक्रमात सहभाग नोंदविला. यावेळी तालुकाप्रमुख प्रमोद बयस यांनी अभियानामागील उद्देश स्पष्ट करताना सांगितले की, वाढत्या ग्लोबल वॉर्मिंगच्या पार्श्वभूमीवर




वृक्षसंवर्धन ही काळाची गरज बनली आहे. वातावरणातील प्राणवायूचे प्रमाण वाढविणे, पर्यावरणीय समतोल राखणे आणि भावी पिढ्यांना हिरवागार वारसा देणे हा या अभियानाचा मुख्य हेतू आहे. स्वामी नरेंद्राचार्यजी महाराज यांच्या आवाहनानुसार देशभरातील लाखो भक्त आणि स्वयंसेवक दरवर्षी मोठ्या प्रमाणावर वृक्षांची लागवड करून त्यांचे संगोपन करतात. फक्त वृक्ष लावणे हा या उपक्रमाचा उद्देश नसून, प्रत्येक वृक्षाचे स्वतःच्या मुलाप्रमाणे संगोपन करणे हीच या 'हरित यज्ञ'ची खरी संकल्पना असल्याचेही त्यांनी सांगितले. यावर्षी धरणगाव शहर व तालुक्यात आतापर्यंत १०० हून अधिक वृक्षांची लागवड करण्यात आली असून, पुढील पाच दिवसांत आणखी १०० वृक्षांची लागवड करून किमान २०० वृक्षांचे उद्दिष्ट पूर्ण करण्यात येणार असल्याची माहितीही यावेळी तालुका प्रमुख प्रमोद बयस यांनी दिली. या प्रसंगी शिवसेना (उबाठा) उपनेते गुलाबराव वाघ, नगरसेवक परमेश्वर महाजन, ज्ञानेश्वर महाजन, तालुकाप्रमुख प्रमोद बयस, शहरप्रमुख अरुण पाटील, सचिव रामकृष्ण माळी, मुन्ना मराठे, कॅम्प प्रमुख खुशाल भावसार, अमोल चौधरी, संजीवनी प्रमुख राजेंद्र अवसरमोल, वीरसिंह बयस यांच्यासह मोठ्या संख्येने गुरुबंधू उपस्थित होते. पर्यावरण संरक्षण ही फक्त शासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे सामाजिक कर्तव्य आहे, हा संदेश देणारे हे अभियान धरणगाव तालुक्यात जनजागृतीसोबतच हरित भविष्याच्या दिशेने उचललेले महत्त्वपूर्ण पाऊल ठरत आहे.

## मुख्यमंत्री पशुधन योजनेत जिल्हा राज्यात अव्वल ठरवण्यासाठी पशुपालकांनी पुढाकार घ्यावा : नायर

**जन सम्राट टाईम्स**

**जळगाव | प्रतिनिधी :** मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजनेत जळगाव जिल्हा राज्यात अव्वल ठरावा, यासाठी पात्र पशुपालक आणि शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी करिश्मा नायर यांनी केले.



पशुपालन हा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असून शेतकऱ्यांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी शासन आणि प्रशासन त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजनेच्या जनजागृतीसाठी पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र शासन आणि कार्डियन करेक्ट इंटरनॅशनल फाउंडेशन (CCIF) यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा परिषद, जळगाव येथील छत्रपती शाहू महाराज सभागृहात विशेष जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी करिश्मा नायर यांनी पशुपालन क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, शासकीय योजनांचा प्रभावी लाभ आणि ग्रामीण भागातील स्वयंरोजगाराच्या संधी यावर भर देत अधिकाधिक पशुपालकांनी शासनाच्या योजनांमध्ये सहभागी होण्याचे आवाहन केले. मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना ही ग्रामीण भागातील पशुपालकांचे उत्पन्न वाढविणे, रोजगारनिर्मितीला चालना देणे आणि पशुपालन व्यवसाय अधिक सक्षम करण्याच्या उद्देशाने राबविण्यात येत असल्याचेही यावेळी सांगण्यात आले. कार्यक्रमात पशुसंवर्धन विभागाच्या अधिकाऱ्यांनी योजनेची उद्दिष्टे, पात्रता, अर्ज प्रक्रिया तसेच उपलब्ध अनुदानाबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. उपस्थित पशुपालकांनीही विविध शंकांचे निरसन करून योजनेबाबत माहिती जाणून घेतली.

## दुर्मिळ रक्तविकारावर मात; १५ वर्षीय मुलाला नवजीवन

### डॉक्टरांचाही भावनिक क्षण



**जन सम्राट टाईम्स**

**भुसावळ | प्रतिनिधी :** १५ वर्षीय मुलाच्या जीवावर बेतलेल्या दुर्मिळ रक्तविकारावर वेळेत उपचार करून त्याला नवजीवन मिळाल्याची हृदयस्पर्शी घटना समोर आली आहे. भुसावळ येथील डॉ. राजेश मानवतकर (एम.डी., मेडिसिन व हृदयरोग तज्ज्ञ) यांनी या अनुभवाबद्दल भावना व्यक्त करत, "आजचा दिवस माझ्यासाठी डॉक्टर म्हणून नव्हे, तर माणूस म्हणूनही अत्यंत समाधानाचा आणि भावनिक ठरला," असे सांगितले. काही दिवसांपूर्वी हा १५ वर्षीय मुलगा अत्यंत गंभीर अवस्थेत त्यांच्या रुग्णालयात दाखल झाला होता. त्याच्या शरीरात मोठ्या प्रमाणात अंतर्गत रक्तस्राव झाला होता. पोटात तब्बल ३ लिटर रक्त साचले होते, रक्तदाब अत्यंत कमी झाला होता आणि जीवाला गंभीर धोका निर्माण झाला होता. तपासणीत त्याला Congenital Afibrinogenemia हा रक्त गोठण्याचा अत्यंत दुर्मिळ आणि जन्मजात विकार असल्याचे निदान झाले. १५ वर्षीय मुलाच्या जीवावर बेतलेल्या दुर्मिळ रक्तविकारावर वेळेत उपचार करून त्याला नवजीवन मिळाल्याची हृदयस्पर्शी घटना समोर आली आहे.या विकारामुळे अगदी किरकोळ कारणानेही जीवघेणा रक्तस्राव होऊ शकतो. डॉ. मानवतकर यांनी परिस्थितीचे गांभीर्य ओळखून तातडीने उपचार सुरू केले, रक्त चढवले आणि पुढील उपचारासाठी रुग्णाला मुंबईतील तज्ज्ञांकडे हलविण्याचा निर्णय घेतला. मुंबईत यशस्वी शस्त्रक्रिया करून पोटातील साचलेले रक्त काढण्यात आले आणि मुलाचा जीव वाचविण्यात यश आले. उपचारानंतर पूर्णपणे बरा झालेला तोच मुलगा नुकताच आपल्या आई-वडिलांसह हसतमुखाने डॉ. मानवतकर यांची भेट घेण्यासाठी आला. .या विकारामुळे अगदी किरकोळ कारणानेही जीवघेणा रक्तस्राव होऊ शकतो. केवळ "धन्यवाद" म्हणण्यासाठी आलेल्या या भेटीने डॉक्टर भावूक झाले. याबाबत भावना व्यक्त करताना डॉ. मानवतकर म्हणाले, "रुग्णाचे हसू, त्याच्या कुटुंबाच्या डोळ्यातील आनंदाश्रू आणि 'आमचा मुलगा वाचला' हे शब्दच डॉक्टर म्हणून आमच्यासाठी सर्वात मोठे बक्षीस असते." या उपचार प्रक्रियेत सहभागी झालेल्या सर्व डॉक्टर, शल्यचिकित्सक, रक्तपेढी, परिचारिका, आरोग्य कर्मचारी, सौ. अर्चना चौधरी तसेच मुंबईतील तज्ज्ञ वैद्यकीय पथकाचे त्यांनी आभार मानले. तसेच "उपचार करणे हे डॉक्टरांचे कर्तव्य असले तरी जीवनदान देणारा खरा वैद्य परमेश्वरच असतो," अशी भावनिक भावना त्यांनी व्यक्त केली.

जन सम्राट टाईम्स — अँकर न्यूज

## जिल्हाधिकारी कार्यालयातील बैठकीत विकास प्रस्तावांवर सकारात्मक चर्चा

### स्मारके आणि सुकी नदी परिसराच्या विकासाला गती देण्याबाबत सकारात्मक प्रतिसाद

**जन सम्राट टाईम्स**

**भडगाव । प्रतिनिधी:** भडगाव शहराच्या सर्वांगीण आणि नियोजनबद्ध विकासाला चालना देणाऱ्या विविध महत्त्वाच्या विषयांवर जळगाव येथील जिल्हाधिकारी कार्यालयात उच्चस्तरीय बैठक पार पडली. शहरातील वडधे, कराब, पेठ आणि यशवंतनगर परिसरातील शासकीय जमिनींसह अनेक प्रलंबित विकास प्रस्तावांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. विविध विकासकामांसाठी आवश्यक जागा उपलब्ध करून देण्याबाबत प्रशासनाने सकारात्मक भूमिका घेतल्याचे बैठकीत स्पष्ट झाले. बैठकीत जिल्हा परिषद आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ताब्यातील काही जागा नगरपरिषदेच्या नावे हस्तांतरित करण्याबाबत चर्चा करण्यात आली. तसेच अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या भगोटाधारक ग्रामस्थांच्या जागांचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्याबाबतही सकारात्मक विचारविनिमय झाला.



शहराच्या वाढत्या गरजा लक्षात घेऊन विकासकामांसाठी आवश्यक जागा उपलब्ध करून देणे, प्रादेशिक परिवहन कार्यालय (आरटीओ) सुरू करण्यासाठी योग्य जागा निश्चित करणे तसेच थोर राष्ट्रपुरुष आणि महान विभूतींच्या स्मारकांसाठी स्वतंत्र जागा उपलब्ध करून देण्याच्या प्रस्तावालाही बैठकीत सकारात्मक प्रतिसाद मिळाला. याशिवाय शहराच्या मध्यभागातून वाहणाऱ्या सुकी नदीच्या पात्रातील जागा नगरपरिषदेच्या ताब्यात मिळवून त्या ठिकाणी सार्वजनिक सुविधा, हरित क्षेत्र, मनोरंजन केंद्र आणि नागरिकांसाठी आवश्यक विकासकामे उभारण्याच्या प्रस्तावावरही सविस्तर चर्चा झाली. भडगाव शहराचा दीर्घकालीन आणि नियोजनबद्ध विकास, नागरिकांना दर्जेदार नागरी सुविधा उपलब्ध करून देणे तसेच भविष्यातील विकास आराखड्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी प्रशासन आणि लोकप्रतिनिधींमध्ये समन्वयाने काम करण्यावर बैठकीत भर देण्यात आला. बैठकीत चर्चिलेल्या प्रस्तावांची अंमलबजावणी झाल्यास भडगाव शहराच्या विकासाला नवी गती मिळणार असून, नागरिकांसाठी अधिक सुविधा उपलब्ध होण्यास मदत होईल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

### भगोटाधारक ग्रामस्थांच्या जागांचा प्रश्न मार्गी

अनेक प्रलंबित विकास प्रस्तावांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. विविध विकासकामांसाठी आवश्यक जागा उपलब्ध करून देण्याबाबत प्रशासनाने सकारात्मक भूमिका घेतल्याचे बैठकीत स्पष्ट झाले. बैठकीत जिल्हा परिषद आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ताब्यातील काही जागा नगरपरिषदेच्या नावे हस्तांतरित करण्याबाबत चर्चा करण्यात आली. तसेच अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या भगोटाधारक ग्रामस्थांच्या जागांचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्याबाबतही सकारात्मक विचारविनिमय झाला. आवश्यक जागा उपलब्ध करून देणे, प्रादेशिक परिवहन कार्यालय (आरटीओ) सुरू करण्यासाठी योग्य जागा निश्चित करणे तसेच थोर राष्ट्रपुरुष आणि महान विभूतींच्या स्मारकांसाठी स्वतंत्र जागा उपलब्ध करून देण्याच्या प्रस्तावालाही सकारात्मक प्रतिसाद मिळाला.

# पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या पुढाकाराला यश; विमानतळ मार्गावर 5.05 कोटींची अत्याधुनिक प्रकाशयोजना!

## चिंचोली विमानतळ मार्ग होणार सुरक्षित, प्रकाशमय आणि आकर्षक

जन सम्राट टाईम्स



**जळगाव | प्रतिनिधी :** जळगाव शहराच्या पायाभूत सुविधांमध्ये आणखी एक महत्त्वाची भर पडणार असून, जिल्ह्याचे पालकमंत्री तथा जिल्हा नियोजन समितीचे अध्यक्ष ना. गुलाबराव पाटील यांच्या पुढाकारातून अजिंठा चौफुली ते चिंचोली विमानतळ परिसरापर्यंतच्या प्रमुख मार्गावर अत्याधुनिक एलईडी विद्युत प्रकाशयोजना उभारण्यासाठी ५ कोटी ५ लाख रुपयांच्या कामास प्रशासकीय मंजुरी मिळाली आहे. जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनी या कामास मान्यता दिल्याने प्रकल्पाच्या अंमलबजावणीचा मार्ग मोकळा झाला आहे. जळगाव विमानतळावरून नियमित विमानसेवा सुरू झाल्यानंतर या मार्गावरील वाहतुकीत मोठी वाढ झाली आहे. मात्र, अपुऱ्या प्रकाश व्यवस्थेमुळे रात्रीच्या वेळी वाहनचालक, प्रवासी आणि पादचाऱ्यांना अडचणींचा सामना करावा लागत होता. ही बाब लक्षात घेऊन या मार्गावर कायमस्वरूपी आधुनिक प्रकाशयोजना उभारण्याची मागणी सातत्याने होत होती. दि. ७ जुलै २०२६ रोजी पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत या विषयावर सविस्तर चर्चा झाली. नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत त्यांनी संबंधित विभाग, महापालिका प्रशासन आणि जिल्हाधिकाऱ्यांना प्रस्ताव तातडीने मंजुरीसाठी सादर करण्याचे निर्देश दिले. या प्रकल्पासाठी आमदार सुरेश (राजूमामा) भोळे यांनी सातत्याने पाठपुरावा केला होता. त्यांच्या मागणीला बैठकीत उपस्थित सर्व आमदारांनी पाठिंबा दिला. तसेच जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे, केंद्रीय क्रीडा राज्यमंत्री रक्षाताई खडसे आणि खासदार स्मिताताई वाघ यांच्यासह उपस्थित लोकप्रतिनिधींनीही प्रस्तावाला सकारात्मक प्रतिसाद दिला. त्यानंतर जिल्हा नियोजन समितीने प्रस्तावास एकमताने मंजुरी दिली. समितीच्या मंजुरीनंतर प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करून १५ जुलै २०२६ रोजी जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनी ५.०५ कोटी रुपयांच्या कामास प्रशासकीय मान्यता दिली. या निधीतून अजिंठा चौफुली ते चिंचोली विमानतळ मार्गावर अत्याधुनिक एलईडी पथदिवे उभारले जाणार आहेत. या प्रकल्पामुळे विमानतळाकडे जाणारा प्रमुख मार्ग अधिक सुरक्षित, आधुनिक आणि आकर्षक होणार असून, जळगाव शहराच्या प्रवेशद्वाराचे सौंदर्यही खुलणार आहे. वाढत्या हवाई संपर्काला पूरक अशा पायाभूत सुविधा उभारण्याच्या दृष्टीने हा निर्णय महत्त्वपूर्ण मानला जात आहे.

### कचऱ्याच्या ढिगाऱ्यात शोधमोहीम राबवली

जळगाव विमानतळावरून नियमित विमानसेवा सुरू झाल्यानंतर या मार्गावरील वाहतुकीत मोठी वाढ झाली आहे. मात्र, अपुऱ्या प्रकाश व्यवस्थेमुळे रात्रीच्या वेळी वाहनचालक, प्रवासी आणि पादचाऱ्यांना अडचणींचा सामना करावा लागत होता. ही बाब लक्षात घेऊन या मार्गावर कायमस्वरूपी आधुनिक प्रकाशयोजना उभारण्याची मागणी सातत्याने होत होती. दि. ७ जुलै २०२६ रोजी पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत या विषयावर सविस्तर चर्चा झाली. नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत त्यांनी संबंधित विभाग, महापालिका प्रशासन आणि जिल्हाधिकाऱ्यांना प्रस्ताव तातडीने मंजुरीसाठी सादर करण्याचे निर्देश दिले.

# आमदार राजूमामांच्या पाठपुराव्याला मोठे यश

जन सम्राट टाईम्स

**जळगाव| प्रतिनिधी:|** जळगाव शहरातील प्रमुख मार्ग अधिक सुरक्षित, सुशोभित आणि आधुनिक करण्याच्या दृष्टीने आमदार सुरेश दामु भोळे (राजूमामा) यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला मोठे यश मिळाले आहे. जिल्हा नियोजन समितीच्या (डीपीसी) सन २०२६-२७ च्या आर्थिक वर्षातील अपारंपारिक ऊर्जा विकास लेखाशीर्षांतर्गत ५ कोटी रुपयांच्या निधीस मंजुरी देण्यात आली असून, या निधीतून शहरातील प्रमुख मार्गावर आधुनिक एलईडी पथदिवे बसविण्यात येणार आहेत.

अजिंठा चौफुली ते विमानतळ मार्ग उजळणार

मंजूर निधीतून अजिंठा चौफुली ते विमानतळ या शहरातील महत्त्वाच्या आणि वर्दळीच्या मार्गावर अत्याधुनिक एलईडी पथदिवे उभारले जाणार आहेत. यामुळे या मार्गावरील प्रकाश व्यवस्थेचा प्रश्न कायमस्वरूपी सुटणार असून, विमानतळाकडे ये-जा करणारे प्रवासी, स्थानिक नागरिक आणि वाहनचालकांचा प्रवास अधिक सुरक्षित होणार आहे. आधुनिक प्रकाश व्यवस्थेमुळे शहराच्या सौंदर्यातही भर पडणार आहे.

दोन वर्षांच्या पाठपुराव्याला यश

या विकासकामासाठी आमदार सुरेश भोळे यांनी गेल्या दोन वर्षांपासून मंत्रालयापासून स्थानिक प्रशासनापर्यंत सातत्याने पाठपुरावा केला होता. या प्रस्तावाला पालकमंत्री गुलाबराव पाटील आणि मंत्री गिरीश महाजन यांचेही सहकार्य लाभल्याने निधी मंजुरीची प्रक्रिया वेगाने पूर्ण झाल्याचे सांगण्यात आले.

राज्य नेतृत्वाचे मानले आभार

निधी मंजूर झाल्यानंतर आमदार सुरेश भोळे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार, मंत्री गिरीश महाजन, मंत्री संजय सावकारे आणि पालकमंत्री गुलाबराव पाटील यांचे सहकार्याबद्दल आभार व्यक्त केले.

जन सम्राट टाईम्स — ब्रेक न्यूज

# धुळ्यात १२ किलो गांजासह दोघांना अटक

## स्थानिक गुन्हे शाखेची मोठी कारवाई



जन सम्राट टाईम्स

**धुळे । प्रतिनिधी :** शहरात अमली पदार्थांविरोधातील कारवाईला गती देत स्थानिक गुन्हे शाखेने मोठी कारवाई करत सुमारे १२ किलो गांजासह दोन तरुणांना अटक केली. या कारवाईत सुमारे ३ लाख रुपये किमतीचा गांजा तसेच ५० हजार रुपये किमतीची ॲक्टिव्हा दुचाकी असा एकूण ३ लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर बारे (वारे) यांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, ॲक्टिव्हा (क्रमांक MH-18/BK-0311) वरून दोन तरुण धुळे शहरातील डी-मार्टजवळील विश्वकर्मा भवन परिसरात विक्रीच्या उद्देशाने गांजा घेऊन येणार असल्याची माहिती मिळाली होती. या माहितीची खातरजमा करून पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेने सापळा रचला. राजपत्रित अधिकारी, दोन शासकीय पंच, छायाचित्रकार आणि वजनकाटा धारक यांच्या उपस्थितीत करण्यात आलेल्या छाप्यात संशयित ॲक्टिव्हा थांबवून तपासणी करण्यात आली. त्यावेळी गोणीत ठेवलेला सुमारे १२ किलो गांजा आढळून आला. या प्रकरणी निखिल गोकुळ पाटील (वय २५, रा. छोरिया नगर, डी-मार्टजवळ, धुळे) आणि चेतन जीवन पावरा (वय २१, रा. सैनिक कॉलनी, नगावबारी, धुळे) या दोघांना ताब्यात घेण्यात आले. कारवाईदरम्यान आरोपींकडून ३ लाख रुपये किमतीचा गांजा आणि ५० हजार रुपये किमतीची ॲक्टिव्हा असा एकूण ३ लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी चाळीसगाव रोड पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक २०९/२०२६ अन्वये गुंगीकारक औषधी द्रव्ये व मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ (NDPS) अधिनियम, १९८५ मधील कलम ८(क), २०(ब), २२(क) व २९ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपींना अटक करण्यात आली आहे. पोलीस अधीक्षक विशाल आनंद व अपर पोलीस अधीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर बारे यांच्या नेतृत्वाखाली स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने ही कारवाई यशस्वी केली. अमली पदार्थांची अवैध तस्करी व विक्री करणाऱ्यांविरोधात भविष्यातही कठोर कारवाई सुरूच राहणार असल्याचा इशारा पोलिसांनी दिला आहे.

# कोकण विभाग पत्रकार संघाची ठाणे जिल्हा कार्यकारिणी जाहीर; विजय यादव जिल्हाध्यक्ष

जन सम्राट टाईम्स



**कल्याण | प्रतिनिधी :** कोकण विभाग पत्रकार संघाची ठाणे जिल्हा (शहर) कार्यकारिणी उत्साहपूर्ण वातावरणात जाहीर करण्यात आली. पत्रकारांच्या हक्कांचे संरक्षण, संघटन अधिक सक्षम करणे आणि पत्रकारांमध्ये एकजूट निर्माण करण्याच्या उद्देशाने झालेल्या बैठकीत ठाणे जिल्हा व विविध शहरांच्या नव्या पदाधिकाऱ्यांची घोषणा करण्यात आली. कल्याण येथे सोमवारी झालेल्या या बैठकीच्या अध्यक्षस्थानी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष संजय हंडोरे पाटील होते. यावेळी कोकण विभाग अध्यक्ष जयेश शेलार पाटील, मुंबई विभाग अध्यक्ष रवींद्र देशमुख तसेच पालघर जिल्हाध्यक्ष ॲड. सिद्धार्थ सांबरे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. ठाणे जिल्हा कार्यकारिणी ठाणे जिल्हाध्यक्षपदी विजय यादव यांची नियुक्ती करण्यात आली. उपाध्यक्षपदी महादेव पंजाबी, सचिवपदी आनंद पद्मनाभन व प्रफुल केदारे, सहसचिवपदी करण शर्मा, तर कोषाध्यक्षपदी गोपाल शर्मा यांची निवड करण्यात आली. सदस्य म्हणून मीनल पवार, हरिप्रकाश तिवारी आणि दीपक इंगळे यांची नियुक्ती जाहीर करण्यात आली. कल्याण शहर कार्यकारिणी कल्याण शहराध्यक्षपदी संदीप शेंडगे, डोंबिवली डोंबिवली महिला विभाग अध्यक्षपदी सारिका शिंदे, उपाध्यक्षपदी विद्या कुलकर्णी, तर नवी मुंबई शहराध्यक्षपदी रामचंद्र खडपे यांची नियुक्ती करण्यात आली. याशिवाय कार्याध्यक्षपदी मच्छिंद्र कांबळे, सचिवपदी जितेंद्र कानडे, उपाध्यक्षपदी संभाजी आत्माराम मोरे, अजय शेलार, सुधीर लवांदे व नारायण सुरोशे, सहखजिनदारपदी सचिन कानडे, सहसंघटकपदी राहुल उघडे, संघटकपदी दिनेश जयस्वाल व तानाजी लोणे, सहसचिवपदी संजय भोराडे, तर सदस्य म्हणून सुभाष शेंडगे, विनोद लोखंडे, साईनाथ ठाकरे, भगवान सुरळके आणि रितेश कांबळे यांची नियुक्ती करण्यात आली. बैठकीत बोलताना संस्थापक अध्यक्ष संजय हंडोरे पाटील यांनी पत्रकारांची एकजूट, व्यावसायिक प्रामाणिकपणा आणि संघटनात्मक बळ यांचे महत्त्व अधोरेखित केले. पत्रकारांसाठी मोफत माहिती अधिकार (RTI) प्रशिक्षण, आधुनिक पत्रकारितेतील नवीन तंत्रज्ञान व विविध अभ्यासक्रमांचे नियमित प्रशिक्षण आयोजित करण्यात येणार असल्याची घोषणाही त्यांनी केली. यावेळी जयेश शेलार पाटील, रवींद्र देशमुख आणि ॲड. सिद्धार्थ सांबरे यांनी पत्रकारितेतील बदलते स्वरूप, व्यावसायिक नैतिकता आणि संघटितपणे कार्य करण्याच्या गरजेवर मार्गदर्शन केले. नवीन कार्यकारिणीच्या घोषणेनंतर उपस्थित पत्रकारांनी सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करत संघटनेच्या भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# धुळ्यात गुंगीकारक कफ सिरपचा साठा जप्त

## विनापरवाना विक्रीसाठी आणणारा संशयित एलसीबीच्या जाळ्यात

जन सम्राट टाईम्स



**धुळे | प्रतिनिधी:** धुळे स्थानिक गुन्हे शाखेने (एलसीबी) मानवी मेंदूवर विपरीत परिणाम करणाऱ्या गुंगीकारक कफ सिरपची विनापरवाना विक्री करण्याच्या उद्देशाने साठा बाळगणाऱ्या एका संशयितास अटक करत १४२ बाटल्या जप्त केल्या आहेत. या कारवाईत एकूण ₹२४ हजार ७३० किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून आरोपीविरुद्ध धुळे तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांनी मानवी मेंदूवर विपरीत परिणाम करणाऱ्या गुंगीकारक औषधांची बेकायदेशीर विक्री करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार अपर पोलीस अधीक्षक अजय देवरे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे प्रभारी पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर बारे यांनी विशेष मोहीम राबविली. दरम्यान, दि. १५ जुलै २०२६ रोजी पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर बारे यांना गोपनीय माहिती मिळाली की, मालेगाव येथील एक व्यक्ती गुंगीकारक कफ सिरपच्या बाटल्या विक्रीसाठी मोराणे (ता. जि. धुळे) येथे येणार आहे. या माहितीच्या आधारे एलसीबीच्या पथकाने दोन शासकीय पंच व राजपत्रित अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत मोराणे परिसरातील महामार्गावर सापळा रचला. यावेळी संशयास्पद हालचाल करणाऱ्या शकील सैय्यद दाऊद (वय ३६, रा. नोमाणी नगर, मालेगाव, जि. नाशिक) याला ताब्यात घेऊन त्याच्या ताब्यातील बॅगेची झडती घेण्यात आली. गुंगीकारक कफ सिरपची विनापरवाना विक्री करण्याच्या उद्देशाने साठा बाळगणाऱ्या एका संशयितास अटक करत १४२ बाटल्या जप्त केल्या आहेत. झडतीदरम्यान त्याच्याकडून गुंगीकारक कफ सिरपच्या १४२ बाटल्या आढळून आल्या. या बाटल्या कोणताही वैध परवाना नसताना विक्रीच्या उद्देशाने बाळगल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले. या प्रकरणी आरोपीविरुद्ध धुळे तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ४०३/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता (BNS) मधील संबंधित कलमे तसेच गुंगीकारक औषधी द्रव्ये व मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम (NDPS Act), १९८५ आणि औषधी व सौंदर्य प्रसाधने अधिनियम, १९४० अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक अजय देवरे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे प्रभारी पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर बारे, पोलीस उपनिरीक्षक अमरजित मोरे तसेच पोलीस अंमलदार शशिकांत देवरे, मुकेश वाघ, धर्मेंद्र मोहिते, सुशील शेंडे आणि विवेक वाघमोडे यांच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली.

# ट्रकचालकाच्या खूनप्रकरणातील संशयित रावेरमधून जेरबंद

जन सम्राट टाईम्स

**रावेर। प्रतिनिधी :** अमरावती ग्रामीण जिल्ह्यातील मोर्शी पोलीस ठाण्याच्या हद्दीत ट्रकचालकाचा गळा आवळून खून करून त्यानंतर पुरावे नष्ट करण्यासाठी ट्रकला आग लावल्याच्या गंभीर प्रकरणातील संशयिताला जळगाव जिल्ह्यातील रावेर पोलिसांनी काही तासांत ताब्यात घेत मोठे यश मिळविले आहे. पोलीस निरीक्षक संदीप पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ही धडक कारवाई करण्यात आली. जळालेल्या ट्रकमध्ये चालकाचा मृतदेह मोर्शी पोलीस ठाण्याच्या हद्दीत उभ्या असलेल्या ट्रकच्या केबिनमध्ये चालकाचा जळालेला मृतदेह आढळून आला होता. प्राथमिक तपासात हा अपघात नसून चालकाचा प्रथम गळा आवळून खून करण्यात आला आणि त्यानंतर पुरावे नष्ट करण्याच्या उद्देशाने ट्रकला आग लावण्यात आल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. अस्पष्ट फोटोवरून संशयिताचा शोध अमरावती ग्रामीण पोलिसांकडून संशयित रावेर रेल्वे स्थानक परिसरात असल्याची माहिती मिळाल्यानंतर रावेर पोलिसांनी तातडीने शोधमोहीम हाती घेतली. संशयिताचा केवळ एक अस्पष्ट फोटो उपलब्ध असतानाही पोलिसांनी परिसरात सापळा रचून त्याला ताब्यात घेतले. तो पंजाबकडे पळून जाण्याच्या तयारीत असल्याची माहितीही पोलिसांना मिळाली होती. आयशर ट्रक जप्त ताब्यात घेतलेल्या संशयिताची ओळख मनप्रीतसिंह कश्मीरसिंह रंधावा (वय ४८, रा. मंध्रवाला, ता. अजनाडा, जि. अमृतसर, पंजाब) अशी झाली आहे. त्याच्याकडील पांढऱ्या रंगाचा आयशर ट्रक (क्रमांक PB-02-EW-4299) जप्त करण्यात आला असून तो सध्या रावेर पोलीस ठाण्याच्या ताब्यात आहे. संशयिताचा ताबा घेण्यासाठी अमरावती ग्रामीण पोलिसांचे पथक जळगावकडे रवाना झाले असून प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे. रावेर पोलिसांच्या तत्परतेचे कौतुक अत्यल्प माहिती आणि अस्पष्ट छायाचित्राच्या आधारे संशयिताचा माग काढून काही तासांत त्याला ताब्यात घेण्यात रावेर पोलिसांना यश आले.

# मंदिरफोडी करून पळणारा चोरटा पोलिसांच्या जाळ्यात

## नागरिकाच्या सतर्कतेमुळे रंगेहात अटक

जन सम्राट टाईम्स

**धुळे| प्रतिनिधी :** धुळे शहरातील दसरा मैदान परिसरातील पूर्वमुखी हनुमान मंदिरात चोरी करून पळून जाणाऱ्या १९ वर्षीय चोरट्याला धुळे शहर पोलिसांनी अवघ्या काही वेळात पाठलाग करून रंगेहात अटक केली. डायल ११२ वर मिळालेल्या माहितीच्या आधारे करण्यात आलेल्या या कारवाईत चोरीतील ₹१५ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, नागरिकाच्या सतर्कतेमुळे आरोपीला पकडण्यात पोलिसांना मोठे यश मिळाले. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि. १६ जुलै २०२६ रोजी पहाटे सुमारे ३.०५ वाजता डायल ११२ वरून दसरा मैदान येथील पूर्वमुखी हनुमान मंदिरात चोरी झाल्याची माहिती धुळे शहर पोलीस ठाण्याच्या बिट मार्शल क्रमांक १ यांना मिळाली. माहिती मिळताच धुळे शहर पोलीस ठाण्याचे डी.बी. पथक घटनास्थळी दाखल झाले. मंदिराची पाहणी केल्यानंतर चोरी झाल्याचे स्पष्ट होताच पोलिसांनी परिसरात चोरट्याचा शोध सुरू केला. याचदरम्यान मोटारसायकलवरून जाणारे सचिन वाडीले यांनी पोलिसांना महत्त्वाची माहिती दिली. त्यांनी एका तरुणाला खांद्यावर पेटीसारखी वस्तू घेऊन सहजीवन नगरकडे जाणाऱ्या भुयारी रेल्वे बोगद्याच्या दिशेने पळताना पाहिल्याचे सांगितले. या माहितीच्या आधारे पोलिसांनी परिसरात शोधमोहीम राबवली. काही वेळातच खांद्यावर दोन पेट्या घेऊन पळणारा एक संशयित तरुण दिसून आला. पोलिसांनी तत्काळ त्याला अडवून ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान त्याने आपले नाव समीर शहा रमजान शहा (वय १९, रा. शंभर फुटी रोड, इब्राहिम मशिदीजवळ, धुळे) असे सांगितले. त्याने पूर्वमुखी हनुमान मंदिरात चोरी केल्याची कबुलीही दिली. आरोपीच्या झडतीत मंदिरातील चोरीचा ₹१५ हजार किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या यशस्वी कारवाईत नागरिक सचिन वाडीले यांच्या सतर्कतेमुळे आरोपीला रंगेहात पकडणे शक्य झाल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक अजय देवरे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी राजकुमार उपासे यांच्या मार्गदर्शनाखाली धुळे शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक हेमंतकुमार भामरे, पोलीस उपनिरीक्षक नितीन चौधरी तसेच पोलीस अंमलदार रविकिरण राठोड, कुंदन पटाईत, महेश मोरे, राहुल सरदार, सचिन जैतपुरे, रोहिणी पवार, अमोल पगारे, तुषार पारधी, प्रशांत नाथजोगी, अमित रणमळे, धम्मपाल वाघ, योगेश वानखेडे आणि शाहीद शेख यांच्या पथकाने पार पाडली.

# बीएलओंची माहिती सार्वजनिक करण्यासह सहा प्रमुख मागण्या

## पात्र मतदारांचा मतदानाचा हक्क अबाधित राखण्यासाठी प्रशासनाकडे साकडे

जन सम्राट टाईम्स

**उल्हासनगर | प्रतिनिधी** भारत निवडणूक आयोगामार्फत सुरू असलेल्या विशेष सघन मतदार यादी पुनरीक्षण (Special Intensive Revision - SIR) मोहिमेच्या पार्श्वभूमीवर नागरिकांमध्ये व्यापक जनजागृती करण्यात यावी तसेच प्रत्येक मतदान केंद्रावरील बीएलओ (Booth Level Officer) यांची माहिती सार्वजनिक करण्यात यावी, या प्रमुख मागणीसाठी रिपब्लिकन सेनेच्या वतीने उल्हासनगर तहसीलदारांना निवेदन देण्यात आले. राष्ट्रीय नेते सरसेनानी आनंदराज आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली आणि ठाणे जिल्हाध्यक्ष आबासाहेब चासकर यांच्या मार्गदर्शनाखाली हे निवेदन सादर करण्यात आले. यावेळी पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी मतदार नोंदणी प्रक्रियेदरम्यान अनेक नागरिकांना आवश्यक माहिती मिळत नसल्याबद्दल चिंता व्यक्त केली.



निवेदनात म्हटले आहे की, सध्या सुरू असलेल्या SIR मोहिमेत मतदारांनी आवश्यक कागदपत्रांसह मतदार नोंद अद्ययावत करणे आवश्यक आहे. मात्र, अनेक नागरिकांना संबंधित बीएलओचे नाव, संपर्क क्रमांक, आवश्यक अर्ज आणि कागदपत्रांबाबत पुरेशी माहिती उपलब्ध नसल्याने मोठ्या प्रमाणावर संभ्रम निर्माण होत आहे.

त्यामुळे अनेक पात्र मतदारांच्या घटनात्मक मतदानाच्या अधिकारावर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. या निवेदनावर ठाणे जिल्हा महिला अध्यक्षा अलकाताई जगताप, जिल्हा उपाध्यक्ष प्राचीताई पवार, विधानसभा अध्यक्ष संजय यादव, सरचिटणीस बाळकृष्ण शिंदे, उल्हासनगर शहराध्यक्ष ॲड. महेंद्र निकम, उपाध्यक्ष किशोर निकम, सचिव सुनील भालेराव, संघटक सुनील सोनवणे यांच्यासह अन्य पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

### रिपब्लिकन सेनेच्या प्रमुख मागण्या :

तालुकास्तरावर SIR संदर्भात व्यापक जनजागृती मोहीम राबविण्यात यावी. प्रत्येक मतदान केंद्रावरील बीएलओचे नाव, मोबाईल क्रमांक व कार्यक्षेत्र सार्वजनिक करण्यात यावे. ग्रामपंचायत, नगरपालिका, महानगरपालिका, शासकीय कार्यालये व सार्वजनिक ठिकाणी माहिती फलक लावण्यात यावेत. वृत्तपत्रे, सोशल मीडिया, केबल टीव्ही आणि ध्वनिक्षेपकाद्वारे नागरिकांना आवश्यक माहिती देण्यात यावी. अर्ज भरणे, कागदपत्र पडताळणी आणि मार्गदर्शनासाठी विशेष सहाय्यता केंद्र सुरू करण्यात यावीत. बीएलओंनी आपल्या कार्यक्षेत्रात प्रत्यक्ष भेटी देऊन नागरिकांना मार्गदर्शन करावे. लोकशाही व्यवस्थेत प्रत्येक पात्र नागरिकाचा मतदानाचा अधिकार अबाधित राखणे ही प्रशासनाची जबाबदारी असल्याचे नमूद करत, या मागण्यांवर तातडीने कार्यवाही करण्याची विनंती रिपब्लिकन सेनेने प्रशासनाकडे केली आहे.

Printed, published and Owned by Mukundrao Shamrao Nannaware, and printed at Shri Samarth Krupa Digital Printers, Plot No. 16. S.R. No.39/1 Sadguru Nagar, MIDC Jalgaon-425001 and published at 2nd FLOOR, BALAJI SANKUL, NEAR KHAJAMIYA CHOUK, JALGAON (MS.) PIN - 425001, Editor - Mukundrao Shamrao Nannaware Title Code - T/MH/2026/0422/5204/1306